महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
अमरावतीविभागीय मंडळ, अमरावती–444 602
Email: divsecamt@rediffmail.com
Tel. 0721-2662647, 0721-2662608
Website: sscboardamravati.in

पत्र क्र.अविमं/उमागो/1950
अमरावती, दिनांक 01 / 11 /2023.

**प्रति,**

**मुख्याध्यापक/प्राचार्य,**
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
अमरावती विभाग, अमरावती

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून इ.11 वी व 12 वी च्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला, वाणिज्य, विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमधील बदलाबाबत.**
**संदर्भ:-** पत्र क्र.रा.मं/परीक्षा-2/4738, दिनांक 26/10/2023.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून इ.11 वी व 12 वी च्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला, वाणिज्य, विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांच्या बदलाबाबत परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे.

उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी तसेच सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व विषय शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

**(निलिमा टाके)**
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र:- संबंधित परिपत्रकाची प्रत**

प्रत माहितीस्तव:- मा. सचिव, राज्यमंडळ, पुणे यांना माहितीस्तव.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## परिपत्रक

विषय - शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून इ.११ वी व १२ वी च्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला, वाणिज्य, विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमधील बदलाबाबत...

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ११ वी व इ. १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित (कला, वाणिज्य, विज्ञान) या विषयांच्या प्रश्नपत्रिकेतील सूचनांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

### मूळ सूचना :-

For each multiple choice type of question, it is mandatory to write the corrtect answer along with its alphabet, e.g. (a)----- / (b)-----/ (c)-----/(d)-----, etc. No marks shall be given, if only the correct answer or the alphabet of correct answer is written. Only the first attempt will be considered for evaluation.

### बदल केलेली सूचना :-

For multiple choice type question, only the first attempt will be considered for evaluation.

तरी राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी सूचनांमधील उपरोक्त बदलाबाबत इ. ११ वी व १२ वी चे संबंधित विषय शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना अवगत करावे. तसेच उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर संपादित केल्या जाणाऱ्या प्रश्नपत्रिकांमधील सूचनांमध्ये वरीलप्रमाणे बदल करावा.

(माणिक बांगर)
प्र.सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

पुणे ४११ ००४.
दिनांक २६/१०/२०२३

"मा. सचिवांनी प्रकाशन पूर्व मसुदा मान्य केला आहे."